| Published Date: | 2 Oct 2018 | Publication: | Navshakti (Marathi) |
|---|---|---|---|
| Edition: | Mumbai | Page No: | 12 |
| MAV/CCM: | 5736/9.56 | Circulation: | 93000 |

# टीसीएस आयटी विझ ७ ऑक्टोबरला

मुंबई : टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) या अग्रगण्य आयटी सेवा, सल्लागार आणि व्यवसाय सोल्यूशन्स फर्मने टीसीएस आयटी विझ २०१८ या भारतातील शालेय मुलांसाठीच्या सर्वांत मोठ्या तंत्रज्ञान प्रश्नमंजूषेच्या मुंबई आवृत्तीची आज घोषणा केली. ही स्पर्धा रविवार ७ ऑक्टोबर रोजी इंडियन एज्युकेशन सोसायटी, माणिक सभागृह, लिलावती हॉस्पिटलसमोर, वांद्रे रिक्लमेशन, मुंबई येथे घेतली जाणार आहे. आठवी ते बारावी इयत्तेत शिकणारे शालेय विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेण्यास पात्र आहेत. प्रत्येक शिक्षणसंस्था यामध्ये एक किंवा एकाहून अधिक संघ पाठवू शकते. प्रत्येक संघात दोन स्पर्धक असतील. यासाठी कोणतेही प्रवेशशुल्क नाही.